मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनकडे
सोपविण्यात आलेल्या प्रकल्पांचे
संकलन व संकल्पचित्र प्रस्तावा संदर्भात

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
शासन निर्णय क्र.संकिर्ण २००१/६२/(६९०/२००१)/मोप्र २
मंत्रालय,मुंबई नं : ४०० ०३२
दिनांक: १५.११.२००१

संदर्भ :
१) शासन परिपत्रक क्र.सीडीओ-१०६६/आय (२) दि.४ मे,१९७२
२) शासन निर्णय क्र.एमआयपी/२२७३ आयपी (३)
दि.१४-११-१९७३
३) शासनाचे क्र.एमआयपी-२२७६/११२३/(६३५) टी-२,
दि.१५ जुलै,१९७६ चे अधीक्षक अभियंता,(विगृ) मसंसं नाशिक,
यांना अग्रेषित पत्र.
४) शासन पत्र क्र.एमएजएस-१०८१/२३० एमआयएन (१)
दि.२७ मे, १९८१
५) शासन पत्र क्र.एमएजएस-१०८२/५८८ एमआयएन (१)
दि.९ नोव्हेंबर, १९८२
६) शासन परिपत्रक क्र.सीडीओ-१०८४/(३८५/८४)/पीआरजे-२,
दि.३१ डिसेंबर,१९८४
७) शासन परिपत्रक क्र.सीडीओ-१०९५/२०१९/(४९/९५)/मोप्र (प्र),
दि.१० जून,१९९७
८) शासन पत्र क्र. सीडीओ-१०८७/७५१/(४४४/८७)/मोप्र (प्र),
दि.२०-४-१९९८
९) शासन पत्र क्र. सीडीओ-१०९५/२०२९/(४९/९५)/मोप्र (प्र),
दि.१-७-१९९६
१०) शासन परिपत्रक क्र.सीडीए -१०९५/२०२९/(४९/९५)/मोप्र (प्र),
दि.१७-१०-१९९६

पाटबंधारे विभागांतर्गत मोठया / मध्यम / लघु / जलविद्युत प्रकल्पांचे संकल्पन व संकल्पचित्रे तयार करण्या संदर्भातील पध्दती, याबाबत शासन आदेश मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक, व क्षेत्रीय अधिका-यांना वेळोवेळी देण्यात आले आहेत. यापूर्वीचे सर्व संबंधित आदेश / परिपत्रके अधिक्रमीत करुन सर्वसमावेशक आदेश निर्गमित करण्याचा प्रस्ताव काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. आता या संदर्भात पूर्वीची सर्व परिपत्रके व शासन निर्णय अधिक्रमीत करुन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१.० मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना , नाशिक यांचेकडील कामाचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

(१)प्रकल्प अन्वेषणाचे प्राथमिक काम व केंद्रीय जल आयोग, केंद्रीय विदयुत प्राधिकरणाकडून प्रकल्पांना मंजूरी मिळविण्याचे काम प्रकल्प अन्वेषण मंडळामार्फत केले जाते. मोठया सिंचन व जलविदयुत प्रकल्पांच्या विविध घटकांचे तपशिलवार संकल्पन व संकल्पचित्रे तसेच संकल्पन अहवाल तयार करण्याचे काम क्षेत्रीय अधिका-यांकडून आवश्यक माहिती प्राप्त करुन घेऊन क्षेत्रीय विभागांच्या सहकार्याने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने करावयाचे आहे.

(२)मध्यम व लघु प्रकल्पांच्या बाबतीत ३० मी.पेक्षा जास्त उंचीच्या धरणांच्या अथवा विशिष्ठ समस्या असलेल्या धरणांच्या शीर्षकामांची तपशीलवार संकल्पने व संकल्पचित्रे तयार करणे.

(३)३.५ मी.पेक्षा जास्त पूराची उंची किंवा १० मी. किंवा त्यापेक्षा जास्त अधःपात (Fall) असलेल्या उत्सारी भागाचे संकल्पन करणे.

(४)१५ मी. किंवा त्यापेक्षा जास्त शीर्ष असलेल्या अग्रस्थ नियंत्रकाचे (Head Regulator) संकल्पन करणे.

(५)कालव्यावरील जी बांधकामे खाली नमूद केलेल्यापैकी कोणत्याही एका मापदंडात बरात असतील अशा बांधकामांची संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक, यांनी करावीत.

अ) ज्या बांधकामाची किंमत रुपये ५० लक्ष ते २५० लक्ष इतक्या मर्यादेत आहे, परंतु कालव्याचा विसर्ग ३५ घमी/सेकंद पेक्षा जास्त आहे, अशा कालव्यावरील बांधकामाचे (स्ट्रक्चरचे) संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत.

ब) कालव्यावरील बांधकामाच्या स्तंभाची (पिलरची) तळ पातळी (फाऊंडेशन) पासूनची उंची जर १५ मी. अथवा त्यापेक्षा जास्त असेल तर अशा बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करावीत.

क) कालव्यावरील ज्या बांधकामाची किंमत २.५ कोटी रुपयापेक्षा जास्त असेल अशाही बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत.

ड) कालव्यावरील बांधकामास नुकसान पोहोचल्यामुळे होणारे नुकसान (हॅझार्ड पोटेंशियल स्ट्रक्चर) जर १ कोटी रुपयांपेक्षा जास्त असेल तर अशाही बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करावीत. मात्र कालव्यावरील अशा बांधकामाच्या फुटीमुळे होणा-या नुकसानी संदर्भात, म्हणजेच हॅझार्ड पोटेंशियल संदर्भात, संबंधित मुख्य अभियंता यांना प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

(६)कंत्राटदाराने तयार केलेल्या कालव्याच्या बांधकामाच्या संकल्पनाची तपासणी व मंजूरी.

(७)अस्तित्वात असलेल्या धरणांच्या मजबुतीकरणाचे / उंची वाढविण्यासाठीचे संकल्पन करणे.

(८)बांधकाम पूर्ण झालेल्या प्रकल्पांचे बाबतीत किंवा बांधकाम चालू असलेल्या प्रकल्पांचे बाबतीत संकल्पन व संबंधित बाबी यांचे बाबतीतील विशिष्ट समस्या यांचा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने अभ्यास शासनाच्या आदेशानुसार करुन उपाय सुचवावेत.

(९)मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेस संदर्भ करण्यात आलेल्या सर्व मोठया व मध्यम प्रकल्पाचे बाबतीत संकल्प पूर अभ्यास करणे.

(१०)केंद्रीय जल आयोगाच्या प्रोफॉर्मा रिपोर्ट मधील संदर्भीत प्रश्नाबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे.

असे आढळून आले आहे की, खूप मोठ्या संख्येने क्षेत्रीय बाबी तपशीलवार पृथःकरण व कार्यवाहीसाठी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडे संदर्भीत केली जातात. यामुळे संघटनेवर कामाचा खूप भार वाढतो आणि पर्यायाने संकल्पन अधिकाऱ्यांचे खूप वेळ व श्रम खर्ची पडतात. हयातून त्यांना थोडी मुक्तता देण्यासाठी व त्यांना कामाचे पृथःकरण, संकल्पन इत्यादीकडे जास्त लक्ष देणे शक्य व्हावे हयासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, खालील बाबी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या कार्यकक्षेच्या बाहेर असतील. त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी हयापुढे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडे संदर्भ करण्यात येवू नये.

अ) जलाशयाच्या कार्यक्षमतेशी संलग्न अभ्यास
ब) जलाशयाच्या पार्श्वजलाच्या परिणामांचा अभ्यास
क) धरणातून सोडलेल्या पूराचा धरणाच्या खालील भागावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास
ड) जलाशयातील गाळाचा अभ्यास
इ) जलशास्त्रीय मूळ बांधकामावरील निरिक्षणे

२.० मोठया व मध्यम पाटबंधारे / जलविद्युत प्रकल्पांचे संकल्पन व संकल्पचित्रे शासनास मंजुरीसाठी सादर करण्या संदर्भात यापुढे खालील प्रमाणे पध्दती अवलंबिण्यात यावी.

अ) जलविद्युत व मोठे पाटबंधारे प्रकल्प

जलविद्युत प्रकल्पासह मोठया पाटबंधारे प्रकल्पांच्या शीर्षकामाचा सर्वसाधारण आराखडा, संकल्पन व संकल्पचित्रे शासनास मान्यतेसाठी सादर करावीत. तथापि हा प्रस्ताव शासनास सादर करण्यापूर्वी खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

१) सदर आराखड्याबाबत संबंधित प्रादेशिक मुख्य अभियंता, यांचे अभिप्राय मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने प्राप्त करुन घ्यावेत. मुख्य अभियंता, यांनी पर्यायी आराखडा सूचविला असल्यास त्याबाबत तौलनिक वित्तीय विश्लेषण इत्यादीसह माहिती सर्वसाधारण आराखडा टिप्पणीत अंतर्भूत करुन प्रादेशिक मुख्य अभियंतांच्या अभिप्राया बाबतचे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेचे स्पष्टीकरणही त्यासोबत सादर होणे आवश्यक आहे.

२) सर्वसाधारण आराखड्याबरोबर संलग्न (अपरटेनंट) कामाचे सर्वसाधारण आराखडेही उदा.दगडी धरण, माती धरण, पोहोच व पुच्छ कालवा, सांडवा, सिंचन विमोचक, सिंचन तथा विदयुत विमोचक, उर्जा अपाकरण व्यवस्था (इ.डि.ओ) जलनिस्सारण गॅलरी, धरणात बसवावयाची उपकरणे व त्यासाठीचे समर्थन, दरवाज्यांचा आराखडा वगैरे शक्य तो समाविष्ठ असावेत. या संलग्न कामासाठी पुन्हा स्वतंत्र प्रस्ताव करुन त्यासाठी शासन मान्यतेची गरज भासल्यास योग्य ती कारणमिमांसा देण्यात यावी, यासाठी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेतील विविध शाखांच्या सहकार्याने सर्वसमावेशक सर्वसाधारण आराखडा प्रथम तयार होणे अपेक्षित आहे.

अ) वरील व्यतिरिक्त प्रमाणीकरण न झालेल्या दरवाज्या संदर्भातील आराखडा व संकल्पचित्रे शासनास मान्यतेकरीता सादर व नवीन प्रमाणीकरण करावयाच्या दरवाजांचा आराखडा व संकल्पचित्रे शासनास मान्यतेकरीता सादर करावीत.

ब) कालव्यावरील बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे या विषयावर स्वतंत्रपणे निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील मापदंडानुसार करावीत.

क) धीर्घलागे अथवा कालवा यापैकी कोणाचेही अपारंपारिक पध्दतीने (नॉनकनव्हेंशनल, शंभर लक्ष (१०० लक्ष) रकमेपेक्षा जास्त किंमत असलेल्या बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे

ड) विद्युत विमोचकांच्या आवाज बांधकामाचा (इनटेक स्ट्रक्चरचा) सर्वसाधारण आराखडा

इ) सर्जचे संकल्पन

फ) टेलरेस टनेल व टेल सर्जचे संकल्पन

ग) जलविद्युत प्रकल्पा संदर्भातील वरील बाबीशिवाय मंजूर आराखड्यात मोठ्या प्रमाणावर बदल सुचविणारे प्रस्ताव जसे की, कालव्याऐवजी बोगद्याचा अंतर्भाव, नलिका (कंड्युट) किंवा कालव्यास अस्तरीकरण करणे किंवा वगळणे,भूपृष्ठावरील विद्युतगृहाऐवजी भूपृष्ठाखालील विद्युतगृहाचा अंतर्भाव किंवा पेनस्टॉकची संख्या वगैरे,शासनास सादर करावेत.

३.० जलविद्युत व मोठया पाटबंधारे प्रकल्पाच्या उर्वरित घटक भागाचे संकल्पन व संकल्पचित्रे तसेच इतर सर्व उपघटकांचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने तयार करावीत. व त्यास प्रादेशिक मुख्य अभियंता स्तरावर मान्यता देण्यात यावी.

४.० मध्यम प्रकल्पांचा सर्वसाधारण आराखडा संबंधित प्रादेशिक मुख्य अभियंता यांच्याकडून यायाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर तयार करावा. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने तांत्रिक दृष्टीकोनातून आवश्यक वाटल्यास योग्य ते बदल करावेत व त्यानंतर मध्यम प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा व संकल्पन आणि संकल्पचित्रे तसेच सर्व उपघटकांची संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,नाशिक, यांनी तयार करावीत. तथापि त्यास प्रादेशिक मुख्य अभियंता यांचे स्तरावर मान्यता देण्यात यावी व अशा संकल्पचित्रांची (अहवालासह) प्रत शासनास माहितीसाठी अग्रेषित करावी.

५.० मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने संकल्पचित्रांचे प्रमाणीकरण करावे.

६.० मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या शासनास मान्यतेकरीता सादर करावयाच्या अहवालात संकल्पने व संकल्पचित्रांची संपूर्ण तांत्रिक तपासणी केल्याचे संबंधित कार्यकारी अभियंता व पथक प्रमुख यांचे प्रमाणपत्र अंतर्भूत करणे आवश्यक आहे.

७.० संकल्पचित्रे अहवालात सर्वेक्षणापासून भूतांत्रिक तपासणी पर्यंत सर्व परिमाणे (पॅरामिटर्स) अंतर्भूत करावीत. संकल्पचित्रात व अहवालात परिपूर्णता असावी.

८.० संकल्पचित्रे अहवालासाठी आधारभूत असलेली सर्व मूळ आकडेमोड असलेली कागदपत्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेत जतन केली असल्याचा संदर्भ अहवालात नमूद करण्यात यावा.

९.० वरील संकल्पचित्रांमध्ये अंतर्भूत नसलेली इतर सर्व संकल्पचित्रे व संकल्पने क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी करावयाची आहेत. त्यास सक्षम अधिकाऱ्यांनी तांत्रिक मान्यता द्यावयाची आहे.

१०.० वरील संकल्पचित्रांमध्ये अंतर्भूत नसलेल्या परंतु इतर कोणत्याही विशिष्ट बाबी संदर्भात मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेस अशा कारणमिमांसेसह आवश्यक वाटल्यास त्या बाबींचे संकल्पन व संकल्पचित्र शासनास सादर करण्यात यावे.

११.० बाहेरील संस्थांनी मागणी केल्यास मोठया, मध्यम, व लघु प्रकल्पांची किंवा त्यांचे घटक यांची संकल्पने शासनाच्या मान्यतेनंतर सल्लागारातत तत्वावर तयार करण्यात अथवा तपासण्यात यतील.

१२.० पार्श्विक संकल्पन कार्यक्रमास मुख्य अभियंता (प्र व द) हे मान्यता देतील.

१३.० मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या अधिका-यांनी व क्षेत्रीय अधिका-यांनी वरील आदेश लक्षात घेऊन संकल्पने व संकल्पचित्रे तयार करण्या संदर्भात उचित कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(भ.तु.रेडकर)
शासनाचे उप सचिव

प्रत- मा.कार्यकारी संचालक,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,औरंगाबाद
मा.कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर
मा.कार्यकारी संचालक,तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव
मा.कार्यकारी संचालक,कोकण पाटबंधारे विकास महामंडळ,ठाणे
मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे
सचिव (पा),पाटबंधारे विभाग,मंत्रालय,मुंबई
सचिव (लाक्षेवि),पाटबंधारे विभाग,मंत्रालय,मुंबई
मुख्य अभियंता (दवप्र ) व सह सचिव ,पाटबंधारे विभाग,मंत्रालय,मुंबई
सर्व मुख्य अभियंता,पाटबंधारे विभाग
सर्व अधिक्षक अभियंता,पाटबंधारे विभाग
सर्व पाटबंधारे विभागातील सर्व तांत्रिक कार्यासने
मोप्र (२) संग्रहार्थ

जा.क्र.मसंसं/दवप्र/ ५८०

कार्यकारी अभियंता,[द.व.प्र]
म.सं.सं.नाशिक.
दिनांक : १५/१२/०७

प्रत- कार्यकारी अभियंता, दवप्र १ / २ / ३ / ४ व पु.आ.२, म.सं.सं. नाशिक, यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

[ [illegible] ]
कार्यकारी अभियंता,
संकल्पचित्र विभाग,[द.व.प्र]
म.सं.सं.नाशिक.

नि/१११२०१[६][१]



C:\My Documents\shalaka 43 99.doc